# गहू पिकांमधील किडींचे व्यवस्थापन

अभय अरविंद शिंदे
सहाय्यक प्राध्यापक
किटकशास्त्र विभाग

विजय अविनाश माने
सहाय्यक प्राध्यापक
वनस्पतीशास्त्र विभाग

साईकृपा कृषी महाविद्यालय, घारगाव

गहू पिकामध्ये उत्पादनात घट येण्यामागे किडींचा प्रादुर्भाव हे एक महत्वाचे कारण आहे. भारतामध्ये गव्हाचे अंदाजे सुमारे ४.१ मेट्रिक टन वार्षिक नुकसान किडींमुळे होते. त्यामुळे या किडींचे वेळीच व्यवस्थापन करणे आवश्यक आहे.

### खोडकिडा:



लक्षणे:

• या किडीचा पतंग हा तपकिरी रंगाचा असून त्याच्या मागील पंखांचा रंग हा पांढरा असतो. अळी हि गुलाबी रंगाची असून तिचे डोके काळ्या रंगाचे असते. पूर्ण वाढ झालेली अळी हि साधारणत: २५-३० मिली मीटरची असते.

• अळी खोडात शिरून आतील भागावर उपजीविका करते, त्यामुळे रोपे सुकून जातात यालाच डेड हार्ट म्हणतात व त्यांना ओंब्या येत नाहीत. फुलोऱ्यामध्ये या किडीचा प्रादुर्भाव झाल्यास ओंब्यांमध्ये दाणे भरत नाहीत तसेच ओंब्या वळतात यालाच पांढऱ्या ओंब्या असे म्हणतात.

नियंत्रण:

• जमिनीची खोल नांगरट करून काडी, कचरा, धसकटे वेचून शेत साफ ठेवावे. खोड किडीचा प्रादुर्भाव झालेली रोपे उपटून ते नष्ट करावेत. सायपरमेथ्रीन (१० ई. सी.) १.१ मि.ली. प्रति लिटर पाणी फवारणी करावी.

• ॲपॅंटेल्स, टेलेनोमस, ट्रायकोग्रामा जॅपोनिकम, ट्रायकोग्रामा चिलोनिस, ब्रॅकोन, कोळी, मिरिड बग यासारख्या मित्र किडीचे संगोपन करावे.

### खोडमाशी:




लक्षणे: उशिरा पेरणी झालेल्या गव्हामध्ये किडीचा प्रादुर्भाव आढळतो. अळी पोंग्यात शिरून गाभा खाते. त्यामुळे रोपमर तसेच फुटवे मर दिसून येते.

नियंत्रण: पोंगेमर किंवा फुटवे मर दिसून आल्यास अझाडिरॅक्टिन (निमयुक्त कीटकनाशक) १ मिली किंवा क्विनॉलफॉस (२५% प्रवाही) १.५ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून १ ते २ फवारण्या कराव्यात.

### मावा:



लक्षणे:

• ही कीड फिकट पिवळसर काळपट, हिरवट रंगाची साधारणपणे २ ते ३ मि.मी. लांबीची असते. या किडीच्या शरीराच्या पाठीमागच्या बाजूस दोन नलिकांसारखे अवयव असतात. त्यास कॉर्निकल्स असे म्हणतात.

• या किडीचे पिल्ले व प्रौढ पानांच्या पाठीमागील बाजूस, कोवळे शेंडे तसेच खोडावरील पेशी रस शोषून घेतात. त्यामुळे गहू पिकाचे पाने पिवळसर, रोगट होतात.

• ही कीड मधाप्रमाणे गोड चिकट द्रव विष्ठेद्वारे पानांवर, खोडावर व गव्हाच्या कोवळ्या शेंड्यांवर टाकते. त्यावर बुरशी वाढून पानाची प्रकाशसंश्लेषण क्रिया बंद होते. परिणामी, गहू रोपे किंवा झाडे मरतात. पिकाच्या वाढीवर व उत्पादनावर याचा विपरीत परिणाम होतो.

नियंत्रण:

• आर्थिक नुकसान संकेत पातळी - दहा मावा कीड प्रति रोप. वरील मर्यादा ओलांडल्यानंतर फवारणी प्रति लिटर पाणी व्हर्टिसिलियम लेकॅनी ५ ग्रॅम किंवा मेटारायझियम ५ ग्रॅम १० ते १५ दिवसांच्या अंतराने दोन वेळा फवारावे. थायामिथोक्झाम (२५ डब्ल्यूजी) ०.१ ग्रॅम किंवा ॲसिटामिप्रीड ०.५ ग्रॅम.

• ऑफिडीस, फेलिनस, सिरिफिड माशी, क्रायसोपा, लेडी बर्ड बिटल यासारख्या मित्र किडीचे संगोपन करावे.

### तुडतुडे:

लक्षणे:

• तुडतुडे हे किटक तीन चार मि.मी. लांब पाचरीच्या, आकाराचे हिरवट-राखाडी रंगाचे असतात. हे पानावर तिरकस चालतात.

• तुडतुडे व पिल्ले पानांमधील रस शोषून घेतात. त्यामुळे पाने पडून वाळू लागतात व पिकाची वाढ खुंटते.

नियंत्रण: प्रति लिटर पाणी डायमिथोएट (३० ईसी) १.५ मि.ली. फवारणी करावी.

(संपर्क: +९१ ८३०८४०४७५१)

★ ★ ★